JMD-SAP 2025
24/6/14

Circular file
PA

सिडको/सह.व्य.सं./२०१९/७५/SAP 2025

दिनांक २१.०६.२०१९

# कार्यालयीन आदेश

**विषय :- स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिका धर्तीवर विभागीय कार्यालयाची स्थापना तथा विभाग अधिकारी व तत्सम सहयोगी कर्मचारी यांची पदस्थापना.**

महाराष्ट्र शासनाने सन १९७० मध्ये सिडकोची नवी मुंबईच्या विकासासाठी नियोजन प्राधिकरण व विकासक म्हणून नियुक्ती केली होती. सिडकोने नवी मुंबईमध्ये विविध पायाभूत सुविधा ज्यामध्ये शैक्षणिक, वैद्यकीय, सामजिक, क्रिडा, पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा, रस्ते, सांडपाणी व्यवस्था व मल:निस्सारण इत्यादी विकास केलेला आहे. याचबरोबर विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत अंदाजे दीड लाखापेक्षा अधिक निवासी सदनिका बांधून गरजूवंतांना वाटप केलेल्या आहेत. याचबरोबरीने विविध निवासी, निवासासह वाणिज्य, केवळ वाणिज्य इत्यादी प्रकारचे भूखंड विकासकाच्या माध्यमातून निविदा पध्दतीने, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य इत्यादी प्रकारे विक्री करुन विविध निवासी व वाणिज्य संकूल नवी मुंबईत उभी आहेत.

नवी मुंबई क्षेत्रातील विविध भुखंडधारक (१००.०० चौ.मी क्षेत्रावरील) यांना आवश्यक असणाऱ्या विविध परवानग्या, नाहरकत दाखले, प्रमाणपत्र इ. साठी सिडको भवन येथील वसाहत विभागाकडून आवश्यक सेवा उपलब्ध करुन घ्यावी लागते अशा स्थितीमध्ये सामान्य नागरिक, विकासक, विश्वस्थ संस्था, कंपनी ,भागदारी संस्था, प्रोप्रायटर, कंपनी (मर्यादित) यांना सिडकोकडून भूखंडवाटपानंतर आवश्यक ठरणाऱ्या देय सुविधा देण्यासाठी सिडको मुख्यालयातील वसाहत विभाग, अभियांत्रिकी, नियोजन व अनधिकृत बांधकामे विभागांशी संबंधीत कामांचे विकेंद्रीकरण करुन विभागीय स्तरावर (सिडको नोडल कार्यालय) विभाग कार्यालय स्थापित करण्याचा प्रस्ताव सिडको व्यवस्थापनाच्या विचाराधीन होता. व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी दिलेल्या मान्यतेनुसार नवी मुंबईतील सध्या कार्यरत नोडल कार्यालये आहे तशी कार्यरत राहून वरिष्ठ विकास अधिकारी / विकास अधिकारी यांचेकडे सिडकोच्या विविध विभागाकरीता स्वतंत्रपणे अथवा संयुक्तरित्या खालील दर्शविल्याप्रमाणे विभाग कार्यालय म्हणून घोषित करण्यात येत असून या विभाग कार्यालयाचे संपूर्ण प्रशासकिय नियंत्रण राहिल. घोषित करण्यात आलेले विभाग कार्यालय खालीलप्रमाणे राहतील.

| विभाग कार्यालय | समाविष्ट नोड |
|---|---|
| वाशी | वाशी, तुर्भे |
| ऐरोली | ऐरोली |
| कोपरखैरणे | घणसोली, कोपरखैरणे |
| नेरुळ | नेरुळ, सानपाडा, जुईनगर, सीबीडी |
| उलवा | उलवा, द्रोणागिरी |
| खारघर | खारघर, कामोठे |
| पनवेल | पनवेल, कळंबोली |

सिडको भवनस्थीत वसाहत -१,२ व ३ विभागातून निर्गमित करण्यात येणा-या विविध परवानग्या, ना हरकत दाखले, प्रमाणपत्रे इत्यादींचे विकेंद्रीकरण करण्यात येत असून सदर काम यापूढे विभागीय कार्यालयातून करण्यात येईल. याकरीता सध्या प्रचलित शक्तीप्रदान अधिकारामध्ये (Delegation of Powers) अंशत: / पूर्णत: बदल करण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| कामे | सिडको मुख्यालय | संबंधित विभागीय कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|
| भुखंड हस्तांतरण व त्रिपक्षीय करारनामा करणे | ५०१.०० चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भुखंड | १८.०० चौ.मी. ते ५००.०० चौ.मी. पर्यंतचे क्षेत्रफळाचे भुखंड | वसाहत-२ विभागासाठी हे अधिकार व्यवस्थापक (शहरसेवा-२) यांच्याकडे राहतील |
| भाडेपटटा सोसायटीच्या नांवे हस्तांतरण करणे. | ५०१.०० चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भुखंड | १०१.०० चौ.मी. ते ५०० चौ.मी भुखंड | -- |
| भुखंडावरील बांधकामास मुदतवाढ देणे. | ५०१.०० चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भुखंड | १०१.०० चौ.मी. ते ५०० चौ.मी. पर्यंतचे क्षेत्रफळाचे भुखंड | -- |
| भाडेपटटा खत करणे. (In Non Corporation from Developer under MOFA Act) | ५०१.०० चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भुखंड | १०१.०० चौ.मी. ते ५०० चौ.मी. पर्यंतचे क्षेत्रफळाचे भुखंड | -- |
| भाडेपटटाविलेख (Lease Deed) | ५०१.०० चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भुखंड | १८.०० चौ.मी. ते ५०० चौ.मी क्षेत्रफळाचे भुखंड (Deed of Apartment) | -- |
| गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यास नाहरकत दाखला | -- | -- | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| भुखंडाचे एकत्रीकरणास परवानगी देणे. | १८.०० चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे भुखंड | -- | -- |
| सदनिका/दुकान/ इत्यादींचे हस्तांतरण करणे. | -- | गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्व (निवासी व वाणिज्य गाळयांकरिता) | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ुखंडावरील मावेजा सुल करणे व ्यासंबंधीचे कामे. | केवळ वसाहत-२ विभागासाठी | -- | -- |
| ावेजा नाहरकत ्रमाणपत्र देणे. | केवळ वसाहत-२ विभागासाठी | -- | -- |
| क्षीसपत्रादवारे ुखंड/सदनिका/दुकाने ांचे हस्तांतरण. | -- | गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्व (निवासी व वाणिज्य गाळयांकरिता) | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| ारसाची नोंद करणे भुखंड/सदनिका/दुकाने). | -- | गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्व (निवासी व वाणिज्य गाळयांकरिता) | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| ृहनिर्माण संस्थेमध्ये तिरिक्त सभासद घेणे. | -- | गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्व (निवासी व वाणिज्य गाळयांकरिता) | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) आवश्यक प्रकरणांत स्थापित समितीमार्फत. |
| ात्पुरते पाणी, विद्युत, ्लनिःस्सारन rainage), कायम ाणी व विद्युत ना हरकत माणपत्र | -- | विभागीय कार्यालयातून देण्यांत यावे. | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| ृहनिर्माण संस्थेमध्ये भासदत्व यामध्ये िवाह/घटस्पोट इ. ारणांमुळे नावातील दल | -- | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| ुखंड गहाण ठेवण्यास ाहरकत दाखला देणे | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| सदनिका/दुकान गहाण ठेवण्यास नाहरकत दाखला देणे | -- | गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्व निवासी व वाणिज्य गाळयांकरिता | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| वितीय संस्थांचे (Bank) बोजाची (Lien) नोंद घेणे | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | -- |
| नामनिर्देशानूसार नोंद घेणे | -- | गृहनिर्माण संस्थामधील सभासदत्व निवासी व वाणिज्य गाळयांकरिता | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| न्यायालयीन दावा निकाली काढला असल्यास शुध्दीपत्रक देणे | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). याबाबत प्रस्ताव मुख्यालयात सादर करण्यात येतील | -- |
| पुर्नबांधकाम करण्यास परवानगी देणे | निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक) व साडेबारा टक्के वसाहत-२ विभागातील सर्व भुखंड | -- | -- |
| भुखंडधारक भागिदारी, कंपनी, HUF, Propriater, विश्वस्थ संस्था इ. असल्यास नवीन भागधारकाची अथवा त्यांचे पश्चात इतर भागधारकांची नोंद घेणे | भुखंड वाटपानंतर करारपत्र करत्यावेळी भुखंडधारकामध्ये कोणताही बदल (निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक) व साडेबारा टक्के वसाहत-२ | -- | -- |

Duqane

| | | | |
|---|---|---|---|
| | विभागातील सर्व भुखंड) | | |
| ात्पुरत्या स्वरुपात विहीत मुदतीसाठी ोकळा भुखंडाचा ाडेकरार करणे (Temporary Permission for xhibition, marriage, religious estival etc.) | -- | विभागीय कार्यालयातून देणे | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |
| भुखंडाचे पुर्नवाटप करणे | निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक) व साडेबारा टक्के वसाहत-२ विभागातील सर्व भुखंड | -- | -- |
| सेवाशुल्क भरणा करण्यास लेखा विभागास टिपणी पाठविणे | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | -- |
| मुळ संचिका गहाळ झाल्यास अथवा उपलब्ध नसल्यास दुय्यम संचिका तयार करणे | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | प्रचलित धोरणानूसार (As per Policy) |
| सिडकोच्या मालकीच्या भुखंडावर अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम झाले असल्यास ते निष्कासित करणे | -- | निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक), उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड तसेच जे भुखंड मुळात गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | |
| सिडकोच्या मालकीच्या भुखंडाशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणे, पोलीस खात्यामार्फत तसेच मुख्य दक्षता अधिकारी यांच्या मार्फत करण्यात येणा-या चौकशी/तपासणीबाबतची प्रकरणे, माहितीच्या अधिकारा बाबतचे कामकाज, शासकीय संदर्भ, तक्रारअर्ज तसेच या भुखंडाच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या अर्जावरील कार्यवाही करणे | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | संबंधीत व्यवस्थापक (शहरसेवा), सह व्यवस्थापकीय संचालक व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्येतेने |
| विधानसभा, विधानपरिषद मधील उपस्थित होणारे तारांकित/अतारांकित प्रश्न, विधिमंडळातील कामकाजासंदर्भात करावयाची अर्धा तास चर्चा इत्यादी वरील कार्यवाही. | केवळ ५०१.०० चौ.मी क्षेत्राचे व त्यावरील निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य,) मात्र सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक , उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड इ. भुखंडाचे सर्व क्षेत्रासाठी काम मुख्यालयातूनच पहाण्यात येईल | भुखंड क्षेत्र १०१.०० चौ.मी ते ५००.०० चौ.मी. जे निवासी व गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). | संबंधीत व्यवस्थापक (शहरसेवा), यांच्यामार्फत सह व्यवस्थापकीय संचालक व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्येतेने |
| भुखंड ज्या प्रयोजनासाठी वाटप करण्यात आला आहे त्याप्रयोजनाव्यतिरिक्त भुखंडाचा वापर होत असल्यास सदर भुखंड परत सिडकोच्या ताब्यात घेणे | निविदा पध्दतीने वाटप भुखंड (गृहनिर्माण संस्था, निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक), उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड | भुखंड जे मुळात गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). विभागीय स्तरावर योग्य ती छाननी करुन प्रस्ताव सादर | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारनुसार (Delegation of Powers) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करावा. | |
| करारपत्रातील अटींचा भंग केल्याने भुखंडधारकांबरोबर केलेले करारपत्र रद्द करणे व भुखंडाचा ताबा सिडकोकडे परत घेणे | निविदा पध्दतीने वाटप भुखंड (निवासी, निवासासह वाणिज्य व वाणिज्य, सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक, धार्मिक), उच्च विद्युत वाहन्याखालील भुखंड | भुखंड जे मुळात गृहनिर्माण संस्थेस वाटप झालेले आहे व ज्या भुखंडांवर वसाहत-१,२ व ३ विभागामध्ये गृहनिर्माण संस्था स्थापनेस परवानगी देऊन भुखंड गृहनिर्माण संस्थेच्या नावे हस्तांतरित झाले आहे/भाडेपटटाविलेख झालेले आहे(Conveyance Deed). विभागीय स्तरावर योग्य ती छाननी करुन प्रस्ताव सादर करावा. | प्रचलित शक्तीप्रदान अधिकारानुसार (Delegation of Powers) |

वर नमुद कामकाजामध्ये उल्लेख नसलेल्या वसाहत विभागाच्या कामकाजासाठी संबंधिसाठीचे सध्या प्रदान करण्यात आलेले प्रचलित शक्तीप्रदान अधिकार (Delegation of Powers) कायम राहतील. वरील नवीन कार्यप्रणाली तातडीने, विनाविलंब व निर्धारित वेळेत लागू होण्यासाठी संबंधित विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे आवश्यक कर्मचारीवृंदांची पदस्थापना, संबंधित कर्मचा-यांना नेमून दिलेली कामे व अशा कर्मचारीवृंदांचा पदस्थापना करण्याचा निर्धारित कालावधी खालीलप्रमाणे राहिल.

| संबंधित विभागप्रमुख | करावयाची कार्यवाही | नेमून दिलेली कामे | निर्धारित कालावधी |
|---|---|---|---|
| व्यवस्थापक (शहरसेवा- १,२,३) | नवीन कार्यप्रणालीनुसार वसाहत १,२,३ विभागातील आवश्यक भूखंडांच्या नस्त्यांची / अभिलेखांची प्रतिलिपी / दुय्यम प्रती तयार करुन विभागीय कार्यालयाकडे निर्गमित करण्यासाठी आवश्यक पूर्तता करणे. | -- | २८ जून २०१९ पर्यंत |
| मुख्य अभियंता (नवी मुंबई) | घोषित केलेल्या विभागीय कार्यालयांसाठी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील कर्मचारीवृंद आवश्यक संख्येमध्ये उपलब्ध करुन देणे / पदस्थापना करणे. | अभियांत्रिकी विभागाशी संबंधित विभागीय कार्यालयातील विविध परवानग्या देणे तसेच विभागीय कार्यालयास (Divisional Office) आवश्यकतेनुसार तांत्रिक सहाय्य करणे. विभागीय स्तरावर सध्या अधिक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता यांची संबंधित विभागाच्या विकासासाठी कार्यरत संरचना / | २८ जून २०१९ पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कायपध्दता/आधकारक्षत्र कायम राहील. | |
| मुख्य नियोजनकार व वास्तूशास्त्रज्ञ विभाग | घोषित केलेल्या विभागीय कार्यालयांसाठी उपनियोजनकार या संवर्गातील कर्मचारीवृंद आवश्यक संख्येमध्ये उपलब्ध करुन देणे / पदस्थापना करणे. | विभागीय क्षेत्रातील शिल्लक भूखंडांशी निगडित नियोजन विभागाची कामे (Zone Change वगळून), वसाहत, अनधिकृत बांधकामे इत्यादी विभागाच्या कामासाठी विभाग कार्यालयास आवश्यकतेनुसार सहाय्य करणे. | २८ जून २०१९ पर्यंत |
| मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड) | घोषित केलेल्या विभागीय कार्यालयांसाठी भूमापक या संवर्गातील कर्मचारीवृंद आवश्यक संख्येमध्ये उपलब्ध करुन देणे / पदस्थापना करणे. | विभागातील वाटप न झालेल्या भूखंडांचे नियमीत सर्वेक्षण करुन संरक्षण करणे, अतिक्रमणास प्रतिबंध करणे, भूखंडावरील अस्तित्वात असलेले अतिक्रमण/ अनधिकृत बांधकामाबाबत तसा अहवाल सादर करणे, एमआरटीपी नोटीस देणे, अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण निष्कासनासाठी विभागीय कार्यालयास तांत्रिक सहाय्य करणे, आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या स्तरावर निष्कासन कार्यवाही करणे. विभागीय कार्यालयातील वसाहत व नियोजन इत्यादी बाबतच्या कामासाठी विभाग कार्यालयास आवश्यकतेनुसार सहाय्य करणे. गरजेपोटी बांधलेली/ नागरी समूह विकास योजनेअंतर्गत सर्वेक्षण, अहवाल तयार करणे व त्या अनुषंगाने सर्व कामकाज करणे. | २८ जून २०१९ पर्यंत |
| व्यवस्थापक (कार्मिक) | विभागीय कार्यालयासाठी आवश्यकतेनुसार सद्यस्थितीमधील कार्यरत कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेऊन सामान्य संवर्गातील जसे सहा.विकास अधिकारी ते शिपाई या संवर्गातील कर्मचारी उपलब्ध करुन देणे. | नियुक्त कर्मचारी/ अधिकारी वर्ग आवश्यकतेनुसार विभागीय कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाजांतर्गत विभागीय अधिकारी यांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे व कर्तव्ये पार पाडणे | कर्मचारीवृंदाची प्रत्यक्ष नेमणूक झाल्यानंतर |
| व्यवस्थापक (प्रणाली) | विभागीय कार्यालयासाठी आवश्यकतेनुसार व संख्येत माहिती तंत्रज्ञान सामुग्री उपलब्ध करुन दयावी. | विभागीय कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाज सुरळित चालण्यासाठी | २८ जून २०१९ पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| कार्यकारी अभियंता (नवी मुंबई)/ संबंधित नोडल कार्यकारी अभियंता | विभागीय कार्यालयांसाठी विभागीय अधिकारी व सहयोगी कर्मचारीवृंदासाठी बैठक व्यवस्था (दालन, फर्निचर,कार्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक सर्व बाबी ) उपलब्ध करुन देणे. | विभागीय कार्यालयामध्ये दैनंदिन कामकाज सुरळित चालण्यासाठी | २८ जून २०१९ पर्यंत |

विभागीय कार्यालयासाठी दैनंदिन कामकाजासाठी कायदेविषयक मार्गदर्शन/अभिप्रायासाठी (Legal Opinion) साठी, न्यायालयीन प्रकरणे/दावे, सुनावण्या इ साठी विभागप्रमुखांमार्फत सिडको भवनस्थित विधी विभागाकडे प्रस्ताव सादर करावेत.

घोषित विभागीय कार्यालयासाठी वरिष्ठ विकास अधिकारी (सामान्य)/विकास अधिकारी (सामान्य) हे प्रथम अपिलीय अधिकारी व सहा.विकास अधिकारी हे जनमाहिती अधिकारी म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अन्वये काम करतील व प्राप्त होणाऱ्या प्रथम अपिलावर व माहिती अधिकार अधिनियम-२००५ अन्वये प्राप्त अर्जांवर अनुक्रमे काम करतील.

महामंडळाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ (Right to Service Act) नुसार नागरीकांना/भूखंडधारकांना यापूर्वी निर्धारित वेळेत सेवा पूरविण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार सदर सेवा व तो पुरविण्याचा कालावधी विभागीय कार्यालयास लागू राहील. विभागीय कार्यालयाने देखिल महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम (Right to Service Act) अंतर्गत महामंडळाने घोषित केलेल्या सेवा/कामकाज निर्धारित वेळेत पूर्ण करणेबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सिडको व्यवस्थापनाने सिडको भवनस्थित वसाहत विभाग, अभियांत्रिकी, नियोजन व अनधिकृत बांधकामे या सेवांचे विकेंद्रीकरण करुन विभागीय कार्यालयांच्या माध्यमातून नवी मुंबईतील सामान्य नागरिक, विकासक, विश्वस्थ संस्था, कंपनी ,भागदारी संस्था, प्रोप्रायटर, कंपनी (मर्यादित) यांना सिडकोकडून भुखंडवाटपानंतर आवश्यक ठरणा-या देय सुविधा तत्परतेने, कालमर्यादेत निश्चित केलेले उद्दीष्टे यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागप्रमुखांना वरील नवीन कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी त्यांना नेमून दिलेली जबाबदारी /कार्यपूर्ती निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश या कार्यालयीन आदेशाद्वारे देण्यात येत आहेत.

वरील आदेश व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सह व्यवस्थापकीय संचालक -१

सर्व विभागप्रमुख /खातेप्रमुख

अधिक्षक अभियंता (मुख्यालय):- सर्व संबंधित अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणून आवश्यक कार्यपूती निर्धारित वेळेत करावी.

प्रत माहितस्तव : मा.अध्यक्ष, सिडको यांचे स्वीय सचिव

व्यवस्थापकीय संचालक यांचे वि.का.अ.

सह व्यवस्थापकीय संचालक -१ यांचे स्वीय सचिव

सह व्यवस्थापकीय संचालक -२ यांचे स्वीय सचिव

मुख्य दक्षता अधिकारी यांचे स्वीय सचिव